# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १३७-२३ दिनांक :- ०२/०५/२०२३

## तृतीयपंथी महिला वेश्या दलालाच्या जाळयात अडकलेल्या मॉडेलींग व फोटोशुट करणा-या महिलेची वेश्या व्यवसायातुन सुटका करुन, तृतीयपंथी महिला वेश्या दलालास अटक.

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २९.०४.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना विश्वासनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, तृतीयपंथी महिला वेश्यादलाल नितु रा. अंधेरी, मुंबई हिचेकडे फोटोशुट व मॉडेलींग करणाऱ्या मुली असुन तीचा मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, ती व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना तिचे परिचयाचे फोटोशुट व मॉडेलींग करणा-या मुलींचे फोटो पाठवुन त्यांच्याशी व्हॉटस्अॅप व कॉलींग कॉलव्दारे संपर्क करुन ती अंधेरी, मुंबई परिसरात तसेच मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास लावुन किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार वेश्यागमनाचा मोबदला घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना तृतीयपंथी महिला वेश्यादलाल सुचविल्याप्रमाणे वर्धमान फॅन्टासीचे गेटजवळील फुटपाथ, शिवार गार्डन, मिरारोड पुर्व सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक २९.०४.२०२३ रोजी १५.४० वा. छापा कारवाई केली असता तृतीयपंथी महिला वेश्यादलाल नितु उर्फ संजना सिंह हिने बोगस गिऱ्हाईकास फोटोशुट व मॉडेलींग करणारी मुलीचे फोटो पाठवुन तिस वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवुन, स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वीकारल्याने तिस मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ पिडित मुलीची सुटका करण्यात आली. सदरबाबत स.फौ. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन तृतीयपंथी महिला वेश्यादलाल संजना उर्फ नितु सिंह हिचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I १५७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ तथा अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला पो.अंम अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब. अश्विनी वाघमारे , सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केलेली आहे.

---ooo---